| पुणे पोलीस | वाहतुक शाखा, पुणे शहर<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे | पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE |
|---|---|---|

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./८००/२०२५ दिनांक :-३०/०१/२०२५

**प्रेसनोट**

**विषय :- विनायक चतुर्थी निमित्त फरासखाना भागातील वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत**

शनिवार,दिनांक ०१.०२.२०२५ रोजी,विनायक चतुर्थी असल्याने व शनिवार असल्याने शनिवारवाडा,भिडे वाडा,तुळशीबाग इ.ठिकाणी पर्यटन व खरेदी करीता व श्रीमंत दगडुशेठ गणपती मंदीर दर्शनाकरीता भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर भागातील शिवाजीरोड, लक्ष्मी रोड व इतर रोडवर वाहतूक वाढून सदर ठिकाणी वाहतुकीची कोंडी निर्माण होवुन वाहतुक संथ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीत राहणेकरीता सदर परिसरातील वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे.

याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अमोल झेंडे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन **आवश्यकतेनुसार व तेथील वाहतुकीच्या परिस्थितीनुसार दि. ०१/०२/२०२५ रोजी सकाळी ०७.०० वा. पासून सर्व प्रकारच्या बसेस व चारचाकी वाहनाना बंदी करण्यात येत असून गर्दी संपेपर्यंत सर्व प्रकारच्या** वाहतूकीत खालीलप्रमाणे बदल करीत आहे.

**वाहतूकीतील बदल :-**

१) शिवाजी रोड वरुन स्वारगेटला जाणारे वाहन चालकांसाठी स.गो.बर्वे चौकातुन जंगली महाराज रोडने खंडोजीबाबा चौक टिळक चौक-टिळक रोडने इच्छितस्थळी जावे.

२) स. गो. बर्वे चौकातुन पुणे मनपा भवनकडे जाणारे वाहन चालकांनी स. गो. बर्वे चौकातुन जंगली महाराज रोडने झाशी राणी चौक डावीकडे वळुन इच्छित स्थळी जावे.

३) अप्पा बळवंत चौकातुन बुधवार चौकाकडे जाणारी वाहतूक बुधवार चौकाकडे न जाता सरळ बाजीराव रोडने शनिवार वाडा येथुन इच्छितस्थळी जातील.

(पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर — stamp)

( अमोल झेंडे )
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक,पुणे शहर

**प्रति,**

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

**प्रत :-**

**१. सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – १,२,३,४ (आस्थापना)पुणे शहर.**

**२. पोलीस निरिक्षक,** प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे
२/- सदर प्रेस नोटच्या प्रति पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्दकरण्याची विनंती करावी.

**३. प्रभारी अधिकारी, फरासखाना** वाहतुक विभाग, पुणे शहर.

**४. पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी. सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी.